कृपया प्रसिद्धीसाठी

**समाजाकडून समाजाकडे – द्वारा जागृत पोलीस अधिकारी**

**पोलीस अधिकाऱ्याच्या पुढाकाराने दुष्काळ निवारणासाठी पाणी फाउंडेशनच्या माणदेशातील कामात मदत**

पोलीस हा सरकारी सेवेमधला असा घटक असतो, ज्याचा समाजातील सर्व थरांशी तत्काळ संबंध येतो आणि एखादा संवेदनशील कर्मचारी असेल तर अल्पकाळातील सेवेमध्येसुद्धा त्याचे स्थानिक समाजाशी घट्ट नाते जुळते आणि त्याचे हात 'जोडणारे आणि देणारे हात' होतात.

पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय काळे हे असेच सामाजिक आपलेपणा मानणारे पोलीस कर्मचारी. सध्या त्यांची नियुक्ती पुण्यात बिबवेवाडी पोलीस ठाण्यात आहे.  सेवेनिमित्त महाराष्ट्रभर फिरले, तर आपला मूळ दुष्काळी माण तालुका आणि तिथले मूळ गाव शिंदी बुद्रुक हे सतत त्यांच्या मनात होते.  पाणी फाउंडेशनचे काम तिथे चालू आहे, परंतु मिळेल तितकी मदत हवीच आहे.  संपर्कात आलेल्या सेवाभावी नागरिकांशी बोलून त्यांनी आनंद दर्शन युवा मंच, गौतम लब्धी फाउंडेशन, जैन कॉन्फरन्स राष्ट्रीय युवा शाखा व लायन्स क्लब ऑफ प्लॅटिनम यांच्या संयुक्त विद्यमाने या गावासाठी रु. एक लाखाची मोठी मदत एकत्र केली. ही मदत शिंदी बुद्रुक च्या दुष्काळ निवारणासाठी तसेच तिथे चालू असलेल्या पाणी फाउंडेशनच्या कामामध्ये उपयोगात आणली जाणार आहे.

उपनिरीक्षक काळे यांचे वैशिष्ट्य असे की ते जिथे जातात तिथल्या समाजाशी स्वतःला जोडून घेतात.  यापूर्वी गडचिरोलीला नियुक्तीवर असताना तिथल्या परिस्थितीत सण कसा साजरा करावा याचा विचार करताना, त्यांनी पुन्हा एकदा समाजालाच आवाहन केले होते व पुन्हा समाजानेच भरभरून प्रतिसाद देत या सामाजिक संस्थांच्या माध्यमातून खाऊ, फराळ, कपडे, क्रिकेट व इतर क्रीडासाहित्य असे सुमारे 7 ते 8 लाख रुपये मूल्याचे सामान माननीय पोलीस आयुक्त पुणे यांच्या हस्ते गडचिरोलीला पाठवले. नक्षलग्रस्त भागात काळे यांच्या आवाहनामुळे अशी सुंदर दिवाळी साजरी झाली. या वेळी त्यांनी आपल्या जन्मगावासाठी मदत गोळा करण्याचे ठरवले.

वानवडी विभागाचे सहायक पोलीस आयुक्त श्री. मिलिंद पाटील यांनी या निधी हस्तांतरणाच्या कार्यक्रमात लोकांशी संवाद साधला. "सध्या संपूर्ण महाराष्ट्र दुष्काळात होरपळत आहे.  अनेक मदतीचे हात दुष्काळग्रस्ताच्या मदतीसाठी पुढे येत आहेत.  मात्र श्रमदान करूनदेखील आपण दुष्काळी भागातील नागरिकांना त्यांच्या या दुष्काळाच्या लढाईमध्ये मदत करू शकतो.  प्रत्येकाने दुष्काळी भागात जाऊन आपल्या आर्थिक मदतीसह श्रमदान करावे." असे आवाहन त्यांनी केले.  एवढेच नव्हे, तर येत्या दिवाळीत सुमारे एक लाख रुपये मूल्याची औषधे गडचिरोलीच्या आदिवासी व नक्षलग्रस्त भागात पाठवण्याचे या सेवाभावी संस्थांनी ठरवले आहे.

या कार्यक्रमात श्री. मिलिंद पाटील, सहायक पोलीस आयुक्त, वानवडी विभाग, पुणे शहर, श्री. दत्तात्रय काळे, पोलीस उपनिरीक्षक, श्रीमती मेघा निंबाळकर, महिला पोलीस उपनिरीक्षक व पोलीस ठाण्यातील 10 ते 15 कर्मचारी, तसेच आनंद दर्शन युवा मंच, गौतम लब्धी फाउंडेशन, जैन कॉन्फरन्स राष्ट्रीय युवा शाखा व लायन्स क्लब ऑफ प्लॅटिनम यांचे सदस्य उपस्थित होते.